| (सीएनआर क्र. एमएचएसओ–२०००–०६५८–२०१०) | नियमित दिवाणी दावा क्र. १४२/२०१० |
|---|---|

## निशाण क्र. ९३ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी मयत प्रतिवादी क्र. ४ हरीराम पांडुरंग गायकवाड यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगीसाठी व त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जात वादींचे कथन असे आहे की, सदर दाव्याचे काम चालू असताना यातील प्रतिवादी क्र. ४ हरीराम पांडुरंग गायकवाड हे दि. १९/११/२०२४ रोजी मयत झाले आहेत. तसेच मयत प्रतिवादी क्र. ४ यांची पत्नी नामे लक्ष्मी हरीराम गायकवाड ही देखील प्रतिवादी क्र. ४ मयत होण्याआधीच म्हणजेच दि. २१/०२/२०११ रोजी मयत झालेली आहे. प्रस्तुत मयत प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस अभिलेखावर घेणे न्यायाचे दृष्टीने जरुरीचे झालेले आहे. सबब, प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी वादी यांनी विनंती केली.

३. सदरच्या अर्जास प्रतिवादी क्र. २ तर्फे म्हणणे देण्यात आले असून त्यात त्यांनी असे कथन केले आहे की, सदर अर्जातील मजकुर खरा व कायदेशीर नाही. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. वादींनी प्रतिवादींविरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन मिळण्यासाठी दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जातील कथनाच्या पृष्टयार्थ वादी यांनी नि.क्र. ९४ वर शपथपत्र दाखल केले आहे. वादी यांनी निशाणी क्र. ९६ सोबत प्रतिवादी क्र. ४ यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. सदर मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. ४ हे दि. १९/११/२०२४ रोजी मयत झाल्याचे स्पष्ट होत आहे. वादी करु इच्छीत असलेली दुरुस्ती केल्याने प्रतिवादींच्या न्याय्य हक्कांवर कोणताही परिणाम होणार नाही.

याउलट दाव्याच्या अंतिम निकालाच्या वेळी संदिग्धता राहणार नाही. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. त्यामुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात किंवा विषयात बदल होणार नाही. अर्ज मंजूर केल्यामुळे दोन्ही पक्षकारांमध्ये वाद मिटण्यास मदत होणार आहे. त्यामुळे भविष्यातील गुंता टाळण्यासाठी सदरची दुरुस्ती करणे आवश्यक वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो. वादींनी नि.क्र. ८९ वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर त्यांना मयत प्रतिवादी क्र. ०४ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी तसेच तद्अनुषांगिक दुरुस्ती करण्यासाठी परवानगी देण्यात येते.

२. वादींनी दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत १४ दिवसाच्या आत अभिलेखावर सादर करावी.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.07.16 15:19:38 +0530

**( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )**
सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

दिनांक – १६/०७/२०२६

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १६/०७/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | १६/०७/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | १६/०७/२०२६ |